# १. कौशल्य विकास

कोणत्याही देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी कौशल्य व ज्ञान या दोन प्रेरणादायी बाबी आहेत. सध्याच्या वैश्विक परिस्थिती मध्ये ज्या उद्योन्मुख अर्थव्यवस्थांकडे उच्च कौशल्य पातळी आहे ते देश कोणत्याही आव्हानांचा सामना करू शकतात.




कोणत्याही देशामध्ये कौशल्य विकास कार्यक्रमासाठी मुख्यत: युवा पिढीवर लक्ष केंद्रीत केले जाते. या संदर्भात आपल्या देशाची स्थिती चांगली आहे. लोकसंख्येमधील एक मोठा गट कृतीशील आहे. यामुळे भारताला सुवर्ण संधी प्राप्त होते परंतु त्याचसोबत समोर मोठी आव्हाने देखील उभी ठाकतात. जेव्हा आपली लोकसंख्या विशेषत: युवा पिढी निरोगी, सुशिक्षित व कुशल होईल तेव्हाच आपल्या अर्थव्यवस्थेला याचा लाभ होईल.

भारताकडे युवकांची संख्या अतुलनीय आहे ज्यामुळे भविष्यात सामाजिक व आर्थिक विकास वृध्दींगत होणे निश्चित आहे. आपल्या देशात 605 दशलक्ष लोकं 25 वर्षांपेक्षा लहान आहेत. रोजगारासाठी उपयुक्त कौशल्य प्राप्त करून युवा पिढी परिवर्तनाचे प्रतिनिधी होऊ



शकतात. यामुळे फक्त त्यांचेच जीवन सुधारणार नाही तर दुसऱ्यांच्या आयुष्यात देखील ही युवा पिढी  परिवर्तन घडवू शकते.

साधारणत:सन 1994-95 पासून चिंचणी तारापूर शिक्षण संस्थेने कौशल्य विकास साठीचे +++ सारखे कोर्सेस मा. रजनीकांत भाई श्रॉफ यांनी आपल्या संस्थेत सुरू केले. कौशल्य विकास ला चालना देश पातळीवर सन 2016 नंतर मिळाली पण चिं.ता. शिक्षण संस्था मात्र त्यापूर्वीच एक दशक अगोदर हे काम करीत होती. मा. रजनीकांत भाई श्रॉफ यांनी श्री. जे.पी. नाईक यांच्या शैक्षणिक धोरणाचा खऱ्या अर्थाने आपल्या संस्थेत स्वीकार केला आणि कौशल्य विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जात आहे.

महाविद्यालयीन अभ्यासक्रमात अनौपचारिक व व्यवसायभिमुख शिक्षण दिल्याने विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवता येईल



हे उद्दिष्ट समोर ठेवून कला व वाणिज्य शाखेला पूरक ठरतील असे उपक्रम आखले. सर्वच क्षेत्रात जोरदार स्पर्धा असल्याने के वळ शालेय किंवा महाविद्यालयीन ज्ञानाच्या शिदोरीवर अवलंबून राहता येणार नाही हे लक्षात आल्याने संस्थेचे चेअरमन मा. श्री. रजनीकांतभाई श्रॉफ यांनी कॉलेज विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच अन्य व्यवसायोपयोगी कला/ उद्योगाचे प्रशिक्षण देण्याचे ठरविले आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना व्यावहारिक जगात आत्मविश्वासाने पाऊल टाकता यावे व त्यांच्या भावी जीवनाशी

सुसंगती साधता यावी. चिंचणी तारापूर शिक्षण संस्थेत एकूण १३ कौशल्य विकास कार्यक्रम सुरू आहेत. ते पुढील प्रमाणे : १. योग २. संभाषण कौशल्य ३. पाक कला ४. ट्रॅव्हल्स एन्ड टुरीझम ५. हस्तकला ६. टेलरिंग ७. ब्युटी पार्लर ८. बागकाम ९. सौरऊर्जा १०. पेपर आर्ट ,११. वारली पेंटींग १२. सूत्रसंचालन कौशल्य १३. शिल्पकला.



नवीन शैक्षणिक धोरण 2020 अंतर्गत शाळा , कनिष्ठ महाविद्यालये व वरिष्ठ महाविद्यालये यांची भूमिका फार महत्त्वाची असणार आहे. विद्यार्थ्यांना Multiple Entry व Multiple Exit असणार आहेत . यामुळे विद्यार्थी आपल्याला हवे ते कौशल्या साठी वेळ देता येणार आहे. कौशल्य प्राप्त केल्या नंतर तो शिक्षणाच्या प्रवाहात पुन्हा येणार आहे आणि हिच लवचिकता विद्यार्थ्यांना सी टी ई एस च्या विविध कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत अनेक कौशल्य आत्मसात करण्यास मदत करणार आहे. जिल्हा कौशल्य

केंद्र, विद्यापीठ स्तरीय कौशल्य केंद्र तर राज्य स्तरीय केंद्र पर्यंत विद्यार्थ्यांना ही कौशल्ये नेण्यासाठी कारणीभूत ठरणार आहे.

**प्रा. संजय बहारे**
**एम. के. ज्युनिअर कॉलेज, चिंचणी**